|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

जळगाव दि.२४ (          ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा जळगाव स्तरावरील युवारंग युवक महोत्सव उद्या गुरुवार, दि.२५ जानेवारी रोजी पु.ओ.नाहाटा महाविद्यालय, भुसावळ  येथे होत असून या महोत्सवात ३५ महाविद्यालयांच्या ७०० विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे.

या शैक्षणिक वर्षापासून कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या संकल्पनेतून जिल्हास्तरीय युवक महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. जळगाव जिल्हयातील महाविद्यालयांची अधिक संख्या लक्षात घेता या जिल्हयाचे दोन विभाग करण्यात आले आहेत. त्यातील जळगाव विभागाचा एक दिवसीय युवक महोत्सव उद्या भुसावळच्या नाहाटा महाविद्यालयात आयोजित करण्यात आला आहे. उद्या होणाऱ्या या महोत्सवात जळगाव, भुसावळ, रावेर, यावल, मुक्ताईनगर, बोदवड आणि विद्यापीठ प्रशाळांमधील ३५ संघाचे ७०० विद्यार्थी सहभागी होत आहेत.

संगीत, नृत्य, साहित्यकला, नाटयकला व ललितकला या पाच कला प्रकारातील २५ उपकला प्रकार या महोत्सवात होणार आहेत.  सकाळी ९ वाजता  सहा रंगमंचावर महोत्सवाला सुरुवात होईल अशी माहिती विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे यांनी दिली.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. २४ जानेवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी